महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
सातारा, बुधवार, दि. २८ जानेवारी २०१५

## रयत शिक्षणचे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे यांचे निधन

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) : रयत शिक्षण



संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांचे सोमवारी हृदयविकाराच्या झटक्याने पुण्यात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी शशीकलाताईंसह एक मुलगा, सून, मुली, नातू, तसेच 'रयत' परिवार आहे. /वृत्त ७

श्री. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# रावसाहेब शिंदे यांचे निधन

श्रीरामपूर (जि. अहमदनगर) : रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांचे सोमवारी हृदयविकाराच्या झटक्याने पुण्यात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी शशीकलाताईंसह एक मुलगा, सून, मुली, नातू, तसेच 'रयत' परिवार आहे.

श्रीरामपूर येथील महादेव मळ्यात मंगळवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, माजी मंत्री गोविंदराव आदिक, शंकरराव कोल्हे, मधुकर पिचड, डॉ. पतंगराव कदम, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब थोरात, अण्णासाहेब म्हस्के, रयतचे उपाध्यक्ष डॉ. अनिल पाटील, आदी उपस्थित होते.

ते २००८ पासून रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व सुमारे ३० वर्षे उपाध्यक्ष होते. स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत, फर्डे वक्ते, वकील अशा अनेक भूमिका त्यांनी लीलया पार पाडल्या.

राष्ट्रपतींपासून सरपंचापर्यंत, पत्रकारापासून चित्रकारापर्यंत मैत्री जपणारे ते दिलदार मित्र अशी त्यांची ओळख होती. महादेव मळ्यात येणाऱ्या मदर तेरेसा, बाबा आमटे, शरद पवारांपासून ते शेतातल्या गड्यापर्यंत सर्वांचे आदरातिथ्य करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व चर्चेत होते. 'नॉलेज इज़ पॉवर' म्हणत रयत विज्ञान परिषदेच्या माध्यमातून ज्ञान पंढरीची दिंडी सुरू केली. विज्ञानाची, परिवर्तनाची पताका स्वत: हाती घेऊन अग्रभागी राहिले. त्यामुळेच 'अंतिम सत्याकडे' शीर्षकाचे इच्छापत्र लिहून 'आम्ही जातो आमुच्या गावा, आमचा राम राम घ्यावा' असे १४ सप्टेंबर १९९५ रोजीच लिहून ठेवले होते. (प्रतिनिधी)

## श्रद्धांजली अर्पण करुन कामकाज थांबविले

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, शिक्षणतज्ज्ञ व गांधीवादी नेते ॲड. रावसाहेब पांडुरंग शिंदे यांचे सोमवार, दि. २६ रोजी हृदयविकाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने रयतेचा आधारवड हरपला असल्याची भावना व्यक्त करत आज (दि. २७) सातारा येथे सकाळी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शाळेचे कामकाज थांबविण्यात आले.

"'रयत'चा वटवृक्ष अण्णासाहेब शिंदे गेल्यानंतर कोलमडला होता. तो सावरण्यात रावसाहेबांचा मोठा वाटा होता. त्यांच्या जाण्याने 'रयत'वर मोठा आघात झाला. संस्थेचे व कर्मवीरांचे काम अखंडपणे सुरू ठेवण्याचे काम रयत सेवकाने करावे, ही खरी ॲड. रावसाहेब शिंदे यांना श्रद्धांजली ठरेल.

- खा. शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री

"गेली सात वर्षे ते संस्थेचे चेअरमन म्हणून काम पाहत होते. त्यांच्या निधनाने 'रयते'चा आधारवड हरपला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी 'रयत'ला नक्कीच जाणवत राहील. तळागाळातील मुलांना दर्जेदार शिक्षण देणे, हीच खरी त्यांना श्रद्धांजली असणार आहे.

- डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.